महाराष्ट्र जनशक्ती


ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ३१९ वे दिनांक : २०/११/२०२६ वार : शुक्रवार

मारहाण प्रकरणी भाजप आमदार महेश बालदी यांना ३ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा



रायगड : उरण विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार महेश बालदी यांना २०१० मधील मारहाणीच्या एका प्रकरणात अलिबाग न्यायालयाने ३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. महेश बालदी यांच्यासह अन्य ३ जणांनाही न्यायालयाने दोषी ठरवले असून, चौघांनाही ही शिक्षा सुनावण्यात आली आहे. तब्बल १६ वर्षांपासून सुरू असलेल्या या खटल्याचा निकाल लागल्याने रायगड जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात या घटनेची चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, न्यायालयाने शिक्षा सुनावल्यानंतर चारही आरोपींना जामीन मंजूर केला आहे. तसेच निकालाविरोधात जिल्हा न्यायालयात अपील करण्यासाठी एक महिन्याची मुदत दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना २०१० मध्ये रायगड जिल्ह्यातील उरण येथे घडली होती. परिसरातील एका मुलीची छेडछाड केल्याचा आरोप एका तरुणावर होता. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर मुलीची छेडछाड करणाऱ्या तरुणाला जाब विचारण्यासाठी महेश बालदी आणि त्यांच्यासोबत काही जण गेले होते. यावेळी संबंधित तरुणासोबत वाद झाला. या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. संबंधित तरुणाला मारहाण करण्यात आली तसेच त्याला शिवीगाळही करण्यात आल्याचा आरोप होता. या घटनेत तरुण गंभीर जखमी झाला होता. या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर या घटनेशी संबंधित खटला अलिबाग येथील न्यायालयात सुरू झाला. घटनेनंतर अनेक वर्षे न्यायालयीन प्रक्रिया सुरू होती. अखेर तब्बल १६ वर्षांनंतर या प्रकरणाचा निकाल जाहीर करण्यात आला. अलिबाग येथील मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयाने या प्रकरणातील पुरावे आणि सुनावणीच्या आधारे आमदार महेश बालदी यांच्यासह चार जणांना दोषी ठरवले. त्यानंतर न्यायालयाने चौघांनाही प्रत्येकी ३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. त्यामुळे विद्यमान भाजप आमदाराला न्यायालयाने शिक्षा सुनावल्याची घटना राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. दरम्यान, न्यायालयाने शिक्षा सुनावल्यानंतरही चारही आरोपींना जामीन मंजूर केला आहे. तसेच या निकालाला जिल्हा न्यायालयात आव्हान देण्यासाठी आरोपींना एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणात पुढील न्यायालयीन प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे. २०१० मध्ये घडलेल्या या घटनेचा निकाल १६ वर्षांनंतर लागला असला, तरी आरोपींकडून अपील केले जाणार का आणि त्यानंतर न्यायालयात काय घडामोडी होतात, याकडे लक्ष लागले आहे.

सावरकरांच्या सन्मानार्थ शिवसेनेचे आंदोलन; सोनिया गांधींचे पोस्टर फाडून निषेध



मुंबई : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या कथित अवमानाच्या मुद्द्यावरून शिवसेना आक्रमक झाली आहे. सावरकरांच्या सन्मानार्थ शिवसेनेच्या वतीने मालाड पूर्व येथे आंदोलन करण्यात आले. शिवसेना नेते संजय निरुपम यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या पुस्तकातील सावरकर यांच्याविषयीच्या कथित आक्षेपार्ह उल्लेखांचा निषेध करण्यात आला. यावेळी सोनिया गांधी यांचे पोस्टर फाडून शिवसैनिकांनी संताप व्यक्त केला. सोनिया गांधी यांनी लिहिलेल्या 'बिलॉन्गिंग : अ जर्नी ऑफ लव्ह' या आत्मचरित्रात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबाबत आक्षेपार्ह मजकूर असल्याचा आरोप संजय निरुपम यांनी केला आहे. या मुद्द्यावरून शिवसेनेच्या वतीने काल पत्रकार परिषद घेऊन निषेध नोंदवण्यात आला होता. त्यानंतर आता मालाड पूर्व येथे आंदोलन करत शिवसेनेने आपली भूमिका आक्रमकपणे मांडली. सावरकर यांच्याबाबत अपमानास्पद वक्तव्य किंवा मजकूर खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही या आंदोलनाच्या माध्यमातून देण्यात आला. या आंदोलनादरम्यान संजय निरुपम यांनी शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जुन्या आंदोलनाची आठवण करून दिली. काँग्रेस नेते मणिशंकर अय्यर यांनी यापूर्वी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याचा बाळासाहेब ठाकरे यांनी तीव्र शब्दांत निषेध केला होता. त्यावेळी दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्क परिसरात अय्यर यांच्या छायाचित्राला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला होता, असे निरुपम यांनी सांगितले. यावेळी बाळासाहेब ठाकरे यांच्या त्या आंदोलनाचे जुने छायाचित्रही दाखवण्यात आले. तसेच मणिशंकर अय्यर यांचे छायाचित्र फाडून निषेध व्यक्त करण्यात आला. सावरकर यांच्याबाबत आक्षेपार्ह भूमिका घेणाऱ्यांना शिवसेना जशास तसे उत्तर देईल, असा आक्रमक संदेश या आंदोलनातून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.दरम्यान, या मुद्द्यावरून संजय निरुपम यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) गटावरही निशाणा साधला. सावरकरांच्या मुद्द्यावरून उबाठा गटाकडून चुकीचे संदेश पसरवले जात असून, त्यातून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. सावरकरांच्या सन्मानाचा प्रश्न हा केवळ राजकीय नसून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाशी संबंधित असल्याची भूमिका शिवसेनेने मांडली. सोनिया गांधी यांच्या पुस्तकातील कथित उल्लेख, मणिशंकर अय्यर यांचे जुने वक्तव्य आणि बाळासाहेब ठाकरे यांनी त्यावेळी केलेले आंदोलन या मुद्द्यांना केंद्रस्थानी ठेवून शिवसेनेने मालाडमध्ये आंदोलन केले. या आंदोलनामुळे सावरकरांच्या कथित अवमानाचा मुद्दा पुन्हा एकदा राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

पुरुष दिनानिमित्त पत्नी पीडित पुरुषांचे अनोखे आंदोलन



छत्रपती संभाजीनगर : जागतिक पुरुष दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगरमधील पत्नी पीडित पुरुष आश्रमाच्या सदस्यांनी अनोख्या पद्धतीने आंदोलन करत आपल्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. पत्नीच्या छळामुळे तसेच कौटुंबिक वादांशी संबंधित काही कायद्यांचा गैरवापर होत असल्याच्या तक्रारींमुळे त्रस्त असलेल्या पुरुषांनी करोडी शिवारातील आश्रम परिसरात हे आंदोलन केले. यावेळी सदस्यांनी चक्क शीर्षासन केले, तर काहींनी कोलांट्या उड्या मारत शासन आणि समाजाच्या भूमिकेचा निषेध नोंदवला. पुरुषांच्या समस्यांकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचा आरोप करत त्यांनी समान न्यायाची मागणी केली. जागतिक पुरुष दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या आंदोलनातून पत्नी पीडित पुरुषांच्या प्रश्नांना सार्वजनिक व्यासपीठ मिळावे, हा उद्देश असल्याचे आश्रमाच्या सदस्यांनी सांगितले. महिलांच्या सुरक्षेसाठी आणि हक्कांसाठी विविध कायदे अस्तित्वात आहेत. मात्र, काही प्रकरणांमध्ये या कायद्यांचा गैरवापर करून पुरुषांना त्रास दिला जात असल्याचा दावा आंदोलकांनी केला. खोट्या तक्रारी, कौटुंबिक हिंसाचाराचे आरोप, पोटगीसंदर्भातील वाद आणि मुलांच्या ताब्याचा प्रश्न यामुळे अनेक पुरुषांना मानसिक आणि सामाजिक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी नमूद केले. भारतीय संविधानातील कलम १४ नुसार कायद्यासमोर सर्व नागरिक समान आहेत, तर कलम २१ नुसार प्रत्येकाला जीवन आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अधिकार आहे. हे अधिकार स्त्री आणि पुरुष दोघांसाठीही समान असल्याचे आश्रमाच्या वतीने सांगण्यात आले. त्यामुळे कौटुंबिक वाद किंवा वैवाहिक संघर्षाच्या प्रकरणांमध्ये केवळ लिंगाच्या आधारावर भूमिका न घेता दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून निष्पक्षपणे न्याय मिळायला हवा, अशी मागणी आंदोलकांनी केली. विवाहानंतर निर्माण होणारे वाद, न्यायालयीन प्रकरणे आणि दीर्घकाळ चालणाऱ्या कायदेशीर प्रक्रियेमुळे संबंधित पुरुषांच्या आयुष्यावर परिणाम होत असल्याचेही आश्रमाने निवेदनात म्हटले आहे. अशा प्रकरणांमध्ये निष्पक्ष चौकशी व्हावी आणि निरपराध व्यक्तींना विनाकारण त्रास सहन करावा लागू नये, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २० नोव्हेंबर २०२६

मोफत शिक्षणासाठी विधानभवनावर पायी संघर्ष यात्रा धडकणार



अतनुर (प्रा. सुधीर पंचगल्ले) : KG ते PG मोफत शिक्षण आणि आरोग्य सेवेसाठी प्रकाश केंद्रे यांचा एल्गार!२४ नोव्हेंबरपासून देऊळवाडी ते नागपूर २१ दिवसांची पायी संघर्ष यात्रा; १४ डिसेंबरला विधानभवनावर धडकणारराज्यातील गरीब, शेतकरी व कष्टकरी विद्यार्थ्यांना KG ते PG पर्यंत मोफत शिक्षण मिळावे, सर्वसामान्यांना मोफत आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी आणि लातूर जिल्ह्यातील भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी करावी, या प्रमुख मागण्यांसाठी रयत शेतकरी संघटनेचे उदगीर तालुका युवा अध्यक्ष प्रकाश केंद्रे मधुकर यांनी देऊळवाडी ते नागपूर पायी संघर्ष यात्रेची घोषणा केली आहे. २४ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजता देऊळवाडी (ता. उदगीर) येथून या यात्रेला प्रारंभ होणार असून, ७ जिल्ह्यांतून पायी प्रवास करत ही यात्रा १४ डिसेंबरला नागपूर विधानभवनावर धडकणार आहे. शासनाने मागण्या मान्य न केल्यास नागपूर येथे बेमुदत अन्नत्याग उपोषणाचा इशारा केंद्रे यांनी दिला आहे.या मागण्यांसाठी यापूर्वी २९ जून २०२६ रोजी निवेदन देण्यात आले होते आणि १५ जुलैपासून उदगीर येथे आमरण उपोषणही करण्यात आले होते. मात्र, प्रशासनाकडून हा विषय शासन स्तरावरील असल्याचे सांगण्यात आल्याने आता थेट हिवाळी अधिवेशनादरम्यान सरकारचे लक्ष वेधण्यासाठी एकट्याने पायी प्रवास करण्याचा निर्णय केंद्रे यांनी घेतला आहे. या यात्रेच्या पोलीस संरक्षणाबाबत मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले आहे.संघर्ष यात्रेतील प्रमुख मागण्या:* मोफत शिक्षण व आरोग्य: राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना पूर्वप्राथमिक ते पदव्युत्तर (KG ते PG) मोफत शिक्षण आणि नागरिकांना शासकीय रुग्णालयांत दर्जेदार व मोफत उपचार मिळावेत.* खासगीकरणावर नियंत्रण: खासगी शाळा, महाविद्यालये, शिकवणी वर्ग आणि रुग्णालयांच्या मनमानी शुल्क आकारणीवर नियंत्रण आणावे.* जिल्हा परिषद शाळांचे संरक्षण: कमी पटसंख्येचे कारण देऊन ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा बंद करू नयेत, उलट त्यांना भौतिक सुविधा द्याव्यात.* भ्रष्टाचाराची चौकशी: लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद बांधकाम, समाजकल्याण, दिव्यांग विभाग आणि पंचायत समितीतील कथित भ्रष्टाचाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी.* जल जीवन मिशनची तपासणी: जिल्ह्यातील जल जीवन मिशनच्या कामांची प्रत्यक्ष तपासणी करून कागदोपत्री कामे दाखवून निधी लाटणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत.असा असेल यात्रेचा मार्ग (७ जिल्हे):१. लातूर ते परभणी: देऊळवाडी, उदगीर, अहमदपूर, गंगाखेड, परभणी.२. परभणी ते वाशिम: परभणी, औंढा नागनाथ, हिंगोली, शिरपूर, वाशिम.३. वाशिम ते अमरावती: वाशिम, कारंजा (लाड), मूर्तिजापूर, बडनेरा, अमरावती.४. अमरावती ते नागपूर: अमरावती, तिवसा (मोझरी), कारंजा (घाडगे), कोंढाळी, बाजारगाव, नागपूर."शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत गरजा सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाऊ नयेत, यासाठी हा लढा आहे. सरकारने ठोस निर्णय न घेतल्यास विधानभवनासमोर बेमुदत अन्नत्याग उपोषण केले जाईल," असा ठाम निर्धार प्रकाश केंद्रे यांनी व्यक्त केला आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

हिवरखेडा गौ. शाळेत माजी विद्यार्थी स्नेहमेळावा संपन्न



कन्नड (अरुण थोरात) : दीपावली सणाच्या आनंददायी पर्वाचे औचित्य साधून हिवरखेडा गौ. शाळेच्या वतीने माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा दि. 17 नोव्हेंबर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिवरखेडा गौ. येथे आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याच्या माध्यमातून जुन्या आठवणींना उजाळा मिळावा, माजी विद्यार्थ्यांनी एकत्र यावे आणि शाळेशी असलेले ऋणानुबंध अधिक दृढ व्हावेत, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. नोकरी, व्यवसाय व इतर कारणांनी बहेरगावी स्थायिक झालेल्या माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या स्नेहमेळाव्याची शोभा वाढवली.कार्यक्रमासाठी प्रभाकर दाभाडे, रविंद्र जाधव, प्रेमसिंग जाधव, उमेश दाभाडे, संजय काळे, दिलीप जाधव, दत्तात्रय दाभाडे, जितेंद्र राठोड, अनिल जाधव, बिजू चव्हाण, रविल चव्हाण, संतोष चव्हाण, अनिल जाधव, दिपक दाभाडे, दिपक दाभाडे, विष्णू राठोड, संजय राठोड, पवन लवांदे, उमेश चव्हाण, संजय जाधव, राजेंद्र जाधव, प्रकाश राठोड, डॉ.कैलास चव्हाण, सुदाम दाभाडे, राजेश जाधव, प्रदीप चव्हाण, सुमनबाई जाधव, नंदनी राठोड, महेंद्र जाधव, डॉ.संदिप चव्हाण, अंजली पवार, रंजना राठोड, शोभा व्यवहारे, सुनिल जाधव, विकास राठोड, अजय राठोड योगेश साबळे,अजयकुमार वैष्णवयाप्रसंगी शाळेत माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. त्यात अध्यक्ष म्हणून डॉ.कैलास चव्हाण,उपाध्यक्ष म्हणून राजेंद्र जाधव तर कोषाध्यक्ष म्हणून दिपक दाभाडे व इतर अकरा सदस्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.भविष्यात शाळेच्या सोयीसुविधा, विद्यार्थी गुणवत्ता, वाचनालय उभारणी व इतर महत्त्वाच्या विषयावर याप्रसंगी चर्चा करण्यात आली. डॉ.कैलास चव्हाण, दिपक दाभाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रम नियोजनासाठी राजेंद्र जाधव, संजय राठोड, राजेश जाधव यांनी विशेष मेहनत घेतली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक बाळासाहेब गावंडे यांनी केले, सुत्रसंचालन दिनेश दाभाडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार विनयकुमार जोशी यांनी मांडले.

संपूर्ण समाज स्व. रोहित पठारेच्या कुटुंबीयांबरोबर.. संजय भैय्या सोनवणे



छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : संपूर्ण आंबेडकरी समाज हा स्वर्गीय रोहित पठारे यांच्या कुटुंबीयांच्या बरोबर असून त्यांनी स्वतःला एकटे समजू नये वेळ प्रसंगी आम्ही मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हिवाळी अधिवेशनात या प्रश्नावर नागपूर येथे घेराव घालून समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या बाबत जाब विचारणार असल्याचे आज महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष संजय भैय्या सोनवणे यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितले संजय सोनवणे हे आज स्वर्गीय रोहित पठारे यांच्या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी इंदापूर बारामती येथून वैजापूर येथे आले होते पठारे कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर त्यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की रोहित पठारे या युवकाची ही हत्या झाली नसून लोकशाहीची हत्या झाली आहे राज्यात कायद्याचा धाक कुणाला राहिला नसून खुलेआम मुर्दे पडत आहे गोरगरीब दलितांवर अन्याय अत्याचार वाढले असून या राज्याचे गृहमंत्री तथा मुख्यमंत्री यांना मात्र या सर्व प्रकरणांशी काही देणे घेणे नसून त्यांना फक्त निवडणुकांमध्ये रस असून सगळीकडे फक्त आपली सत्ता कशी येईल याकडे त्यांचे लक्ष आहे राज्यात कायदा सुव्यवस्था बिघडली असून त्याचे त्यांना काही सोयरसुतुक नाही रोज गोरगरीब दलितांवर अन्याय अत्याचार होत असून त्यांचे खून होत आहे पण सरकार व पोलीस फक्त बघायची भूमिका घेत आहे स्वर्गीय रोहित पठारे याचा खूनही याचे एक ज्वलंत उदाहरण आहे त्याचबरोबर रोहित पठारे च्या खुणा मध्ये जे जे सामील आहेत त्यांना मुख्य आरोपी करून संबंधित पोलीस ठाण्याचे पीआय व बाकी सर्व कर्मचारी यांना आरोपी करण्याची मागणी केली आहे ,रोहित पठारे यांच्या कुटुंबीयांना जर लवकरात लवकर न्याय नाही मिळाला तर येणाऱ्या हिवाळी अधिवेशनात आम्ही महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मुख्यमंत्र्यांना घेराव घालून याबाबत जाब विचारणार असल्याचे त्यांनी सांगितले पठारे कुटुंब एकटे नसून संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या बरोबर असल्याचेही ते यावेळेस म्हणाले यावेळेस संजय भैय्या सोनवणे यांच्याबरोबर वैजापूर येथे रोहित पठारे यांच्या कुटुंबीयांच्या भेट घेण्यासाठी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्राचे प्रदेश उपाध्यक्ष राहुल जी.वडमारे चळवळीचे जेष्ठ नेते राजेंद्र बागुल, पप्पू चंदनशिवे, ओंकार कांबळे, रवी सोनवणे, संजय पगारे, अनिल चंदनशिवे, रतन जाधव, अंबादास बाविस्कर, मारुती सिंगारे, सागर भालेराव, यांच्यासह रिपब्लिकन पक्षाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २० नोव्हेंबर २०२६

गोकुळच्या म्हशीच्या दूध दरात ६, तर गाईच्या दूध दरात २ रुपयांची वाढ



कोल्हापूर : कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या दूध दरात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गोकुळच्या नवनियुक्त संचालक मंडळाच्या पहिल्याच बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यानुसार म्हशीच्या दूध विक्री दरात प्रतिलिटर ६ रुपयांची, तर गाईच्या दूध विक्री दरात प्रतिलिटर २ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार असून म्हशीच्या दूध खरेदी दरात प्रतिलिटर ३ रुपये, तर गाईच्या दूध खरेदी दरात प्रतिलिटर २ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. गोकुळच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी दरवाढ असल्याचे सांगितले जात आहे. शनिवारपासून नवीन दर लागू होणार असल्याची माहिती आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यातील विविध दूध संघांकडून दूध खरेदी आणि विक्री दरात वाढ केली जात आहे. पशुखाद्य, चारा, वाहतूक आणि जनावरांच्या देखभालीचा खर्च वाढल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांवर आर्थिक ताण निर्माण झाला आहे. दुसरीकडे, दूध उत्पादनासाठी लागणारा खर्च वाढत असताना शेतकऱ्यांना मिळणारा दर पुरेसा नसल्याची भूमिका दूध उत्पादकांकडून मांडली जात होती. त्यामुळे गोकुळच्या दूध दरातही वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. अखेर नव्या संचालक मंडळाच्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात आला. गोकुळने घेतलेल्या निर्णयानुसार म्हशीच्या दूध विक्री दरात ६ रुपयांची वाढ केली असली, तरी दूध उत्पादकांना प्रतिलिटर ३ रुपये अधिक मिळणार आहेत. म्हणजेच म्हशीचे दूध संघाला पुरवणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. गाईच्या दूध खरेदी दरातही प्रतिलिटर २ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे गाईचे दूध उत्पादक आणि म्हशीचे दूध उत्पादक अशा दोन्ही घटकांना या निर्णयाचा फायदा होणार आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांना वाढीव दर मिळावा, अशी मागणी समविचारी आघाडीकडून सातत्याने करण्यात येत होती. दुष्काळी परिस्थिती, वाढता उत्पादन खर्च आणि जनावरांच्या संगोपनासाठी लागणारा खर्च लक्षात घेता खरेदी दरात वाढ करणे आवश्यक असल्याचे आघाडीचे म्हणणे होते. दूध विक्री दर वाढवण्यास विरोध नसला, तरी ग्राहकांवरील आर्थिक भार वाढवण्यापूर्वी दूध उत्पादकांना मिळणाऱ्या दरात वाढ करावी, अशी भूमिका समविचारी आघाडीने मांडली होती. गोकुळ दूध संघासमोर आर्थिक तूट भरून काढण्याचे आव्हानही आहे. दूध संघाला सुमारे ७० कोटी रुपयांची तूट असल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर नवनियुक्त चेअरमन आणि संचालक मंडळाने दूध विक्री दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला. विक्री दरात वाढ केल्यामुळे संघाच्या आर्थिक गणिताला आधार मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, याचा थेट परिणाम सर्वसामान्य ग्राहकांच्या घरगुती खर्चावर होणार आहे. दरम्यान, जानेवारी महिन्यात दूध उपलब्धतेचा आढावा घेतल्यानंतर पुन्हा दरवाढीबाबत विचार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आगामी काळात दूध दरात आणखी बदल होणार का, याकडे दूध उत्पादकांसह ग्राहकांचे लक्ष लागले आहे. गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीनंतर चेअरमनपदाच्या निवडीवरून कोल्हापूरच्या राजकारणात मोठी चर्चा रंगली होती. काँग्रेस नेते सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीच्या पॅनेलने निवडणुकीत १३ जागा जिंकून बहुमत मिळवले होते. तर महायुतीच्या पॅनेलला १२ जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे चेअरमनपदावर कोणाची वर्णी लागणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र, संचालक मंडळाच्या बैठकीसाठी आवश्यक असलेल्या १४ सदस्यांच्या संख्येचा मुद्दा उपस्थित झाला. त्यानंतर राज्य सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत गोकुळ दूध संघावर चार शासननियुक्त सदस्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. या सदस्यांना मतदानाचा अधिकारही देण्यात आला. त्यामुळे महायुतीला चेअरमन निवडीसाठी आवश्यक संख्याबळ मिळाले. महायुतीच्या नेतृत्वाखाली माजी आमदार शिवाजी पाटील यांची गोकुळच्या चेअरमनपदी निवड झाली. या निवडीवरून महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये राजकीय आरोप-प्रत्यारोपही झाले होते. अखेर शिवाजी पाटील यांनी चेअरमनपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर संचालक मंडळाच्या पहिल्याच बैठकीत दूध दरवाढीचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे गोकुळच्या नव्या नेतृत्वाच्या पहिल्याच निर्णयाची चर्चा सुरू झाली आहे.

तिफण कविता महोत्सवाच्या अध्यक्षपदी लोककवी प्रशांत मोरे



कन्नड (प्रतिनिधी) : त्रैमासिक तिफण, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड यांच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त आयोजित राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवाच्या नवव्या वर्षाच्या अध्यक्षपदी प्रख्यात लोककवी, गीतकार प्रा. प्रशांत मोरे यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती संयोजक डॉ. शिवाजी हुसे यांनी दिली.लोककवी प्रशांत मोरे हे कवी, सिने पार्श्वगायक, संगीतकार आणि गीतकार आहेत. तहान, स्पर्श, कथा तिच्या लग्नाची या सिनेमांसाठी त्यांनी गीतलेखन, संगीत व पार्श्वगायन केले आहे. आईच्या कविता या त्यांच्या कार्यक्रमाचे भारतभर 5 हजार 6 शे प्रयोग झाले आहेत. हिंदी, उर्दू, मराठी मुशायऱ्यात त्यांनी मराठी भाषेचे नेतृत्व केले आहे.त्यांची वेदना सातारकर...? हजर सर, कबिराचं देणं, ही वस्ती सस्ती हाय पोरा...!, अभिवादन बा भीमा...!, जळत्या दशकाची लोकगाथा, माय अर्थात् आईच्या कविता खंड 1, खंड 2 संपादन, गाणं शतकानुशतकाचं - महाकवी वामनदादा कर्डक ग्रंथ संपादित ही पुस्तकं प्रसिद्ध आहेत. त्यापैकी कबिराचं देणं हे पुस्तक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या तृतीय वर्ष कला अभ्यासक्रमात समाविष्ट आहे, तर त्यांची कविता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातही आहे. लोकसत्ताच्या लोकांकिका 2025 चा सर्वोत्कृष्ट लेखक सन्मान, मुंबई विद्यापीठ युवा महोत्सव 2025 गोल्ड मेडल, महाकवी कालिदास पुरस्कार, गदिमा पुरस्कार, यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार, पद्मश्री नामदेव ढसाळ काव्य पुरस्कार, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महाराष्ट्र कलागौरव पुरस्कार 2026 असे अनेक सन्मान त्यांना मिळाले आहेत.त्यांच्या निवडीबद्दल स्वागताध्यक्ष डॉ. सिताराम जाधव, प्राचार्य डॉ. विजय भोसले, ॲड. कृष्णा जाधव, उत्तमराव राठोड, पी. एम. डहाके, सागर जाधव, गणेश घुगे, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. अंबादास सगट, डॉ. रमेश सूर्यवंशी, डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. संजय गायकवाड, प्रवीण दाभाडे, ज्ञानेश्वर गायके, अरुण थोरात, लक्ष्मण वाल्डे, दत्ता मोरस्कर, श्रीराम दापके, संदीप वाकडे, ब्रह्मगिरी गोस्वामी, प्रकाश शहरवाले, भिमराव सोनवणे, भरत सोनवणे, अजय दवंडे, सुरेश औटे, का. का. थोरात, शिवनाथ गायकवाड आदींनी अभिनंदन केले आहे.

"कष्टाच्या वाटा" कथासंग्रहाचे प्रकाशन



छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : मराठवाड्याचे लोकप्रिय शिक्षक आमदार विक्रमजी काळे यांच्या हस्ते गुरुवारी दिनांक १९ नोव्हेंबर रोजी जेष्ठ नागरिक दिनानिमित्ताने आणि इंदिरा गांधी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर येथील शिक्षक आमदार यांच्या निवासस्थानी बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातील प्रसिद्ध लेखक तथा कवी अय्युब पठाण लोहगावकर यांचा अतिशय दर्जेदार व आशयघन बालकथासंग्रह " कष्टाच्या वाटा " या कथासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले आहे. " कष्टाच्या वाटा " या बाल कथासंग्रहातील " कौतुकाची थाप " ही कथा बालभारतीच्या इयत्ता चौथीच्या मराठी माध्यमाच्या वर्गाला संपूर्ण महाराष्ट्रातील प्राथमिक शाळेच्या जून २०२६ पासून अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. याप्रसंगी राष्ट्रवादी प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष कवी मनोज खुटे व अन्य मान्यवर उपस्थित होते.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २० नोव्हेंबर २०२६

तमाशाच्या रंगमंचावर उजळलेले दिवे... पण कलावंतांच्या आयुष्यात कायमचा अंधार!

काल सहज योगीराज बागुल लिखित ",तमाशा विठाबाईच्या आयुष्याचा " हे चरित्रात्मक पुस्तक हाती घेतले,वाचले आणि तमाशा कलावंतावर एक लेख लिहावा वाटला.'उपेक्षा, उपासमार, अपमान आणि कलेवर आयुष्य अर्पण केलेल्या तमाशा कलावंतांची वेदनादायी कहाणी...'म्हणजे तमाशा कलावंताचं जीनं आहे.महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात अनेक कलाप्रकारांनी आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. या भूमीने संतांची परंपरा जपली, शाहिरांचे पोवाडे ऐकले, भारुडातून प्रबोधन अनुभवले आणि तमाशाच्या फडावर रात्रभर रंगणाऱ्या लावण्यांचा आनंद घेतला. पण या कलाप्रकारांच्या इतिहासात एक अशी वेदना दडलेली आहे, जिच्याकडे आपण फारसे कधी गांभीर्याने पाहिले नाही. ती वेदना आहे आपल्या पारंपरिक लोककलावंतांच्या जगण्याची. विशेषतः तमाशा कलावंतांच्या वाताहतीची! तमाशा म्हणजे केवळ मनोरंजन नव्हते. तो गावखेड्यांच्या जगण्याचा एक अविभाज्य भाग होता. गावात जत्रा असो, यात्रा असो, उत्सव असो किंवा एखादा विशेष प्रसंग असो, तमाशाचा फड लागला की गावात चैतन्य निर्माण व्हायचे. दिवसभर शेतात राबणारा शेतकरी, कष्टाने थकलेला मजूर, गावातील सामान्य माणूस रात्री आपली दुःखे विसरून तमाशाच्या फडावर जमा व्हायचा.ढोलकीचा ठेका सुरू व्हायचा. घुंगरांचा नाद घुमायचा. सोंगाड्याचे विनोद ऐकून लोक हसायचे. लावणीच्या शब्दांवर रसिक दाद द्यायचे. कधी एखाद्या वगनाट्यातून समाजातील अन्यायाचे चित्र उभे राहायचे, तर कधी विनोदाच्या माध्यमातून सावकारशाही, जातिभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक दांभिकतेवर प्रहार व्हायचे.ज्या काळात गावखेड्यांपर्यंत शिक्षण, वर्तमानपत्रे आणि आधुनिक माध्यमे पोहोचली नव्हती, त्या काळात तमाशातील कलावंत आपल्या कलेतून समाजाला जागे करण्याचे काम करत होते. त्यांच्याकडे ना मोठी व्यासपीठे होती, ना आधुनिक प्रकाशयोजना, ना प्रसिद्धीची साधने. तरीही त्यांच्या कलेत एक विलक्षण ताकद होती. त्यांचा फड म्हणजे ग्रामीण समाजाचा जणू उघडा वर्गच होता.पण या रंगलेल्या फडामागचे वास्तव मात्र अत्यंत विदारक होते.ज्या कलावंतांनी संपूर्ण गावाला आनंद दिला, त्यांच्याच आयुष्यात आनंदाचा पत्ता नव्हता.त्यांचा संसार म्हणजे एखाद्या भटक्या पाखरासारखा. आज एका गावात, उद्या दुसऱ्या गावात. डोक्यावर वाद्ये, खांद्यावर कपड्यांच्या पिशव्या, हातात रंगभूषेचे साहित्य आणि बैलगाडीत संसाराचे ओझे. कुणाच्या डोक्यावर ढोलकी, कुणाच्या हातात तुणतुणे, कुणाच्या खांद्यावर पेटी, तर कुणाच्या हातात घुंगरांची गाठोडी. एवढेच त्यांचे वैभव!त्यांच्या प्रवासाला ठरावीक दिशा नव्हती आणि जगण्याला ठरावीक शाश्वती नव्हती. गावाच्या बाहेर कुठेतरी जागा मिळाली की तिथे मुक्काम. पावसाळ्यात पावसाचा मारा, उन्हाळ्यात उन्हाचे चटके आणि थंडीत उघड्यावरची रात्र. मुलाबाळांसह या मंडळींचा संसार रस्त्यावरच असायचा.रात्री कार्यक्रमासाठी गावातील एखाद्या मोकळ्या जागेत फड उभारला जायचा. वीज नसेल तर कंदील लावले जायचे. त्या कंदिलाच्या मंद प्रकाशात कलावंतांची रंगभूषा व्हायची. कुणी चेहऱ्यावर रंग चढवत असायचे, कुणी पदर सावरत असायचे, कुणी घुंगरू बांधत असायचे. त्यांच्या चेहऱ्यावर हसू असायचे; पण त्या हसऱ्या चेहऱ्यांच्या मागे किती काळज्या लपलेल्या असतील, याचा विचार प्रेक्षकांनी कधी केला असेल का?रात्रभर तमाशा रंगायचा. प्रेक्षकांच्या टाळ्यांचा कडकडाट व्हायचा. एखाद्या लावणीला पुन्हा पुन्हा दाद मिळायची. एखाद्या विनोदावर लोक हसून हसून वेडे व्हायचे. पण पहाट होताच सगळे संपायचे. रंगमंच रिकामा व्हायचा. कंदील विझायचे. घुंगरांचा आवाज थांबायचा. आणि कलावंतांच्या वाट्याला पुन्हा तेच वास्तव यायचे.कधी कार्यक्रमाचे पैसे मिळायचे, कधी मिळायचे नाहीत. कधी जेवणाची व्यवस्था व्हायची, तर कधी पोटाची खळगी भरण्यासाठी गावात भाकरी मागण्याची वेळ यायची.जरा विचार करा!रात्रभर हजारो लोकांचे मनोरंजन करणारा कलाकार सकाळी दोन भाकऱ्यांसाठी दारोदार फिरत असेल, तर त्याच्या मनाची अवस्था काय होत असेल? काल ज्याच्या कलेवर गावाने टाळ्यांचा वर्षाव केला, त्याच कलाकाराला आज पोटासाठी कुणाच्या दारात उभे राहावे लागत असेल, तर त्या टाळ्यांना काय अर्थ उरतो?कलेची भूक मोठी असते, हे आपण ऐकले आहे; पण पोटाची भूक त्याहून मोठी असते, हे या कलावंतांनी आयुष्यभर अनुभवले.त्यांच्या कलेला दाद मिळाली, पण त्यांच्या जगण्याला आधार मिळाला नाही.या सगळ्या दारिद्र्यापेक्षाही अधिक वेदनादायक होते ते सामाजिक वागणुकीचे वास्तव. गावातील सावकार, जमीनदार आणि प्रतिष्ठित मंडळींचा या कलावंतांवर मोठा प्रभाव असे. त्यांच्या गरिबीचा फायदा घेतला जाई. अनेकदा अपमानास्पद वागणूक मिळे. कधी मानधनासाठी विनवण्या कराव्या लागत, तर कधी कार्यक्रम संपल्यानंतरही मोबदल्याची प्रतीक्षा करावी लागे.त्यांच्या कलेचा आनंद घेणाऱ्यांपैकी काही जण त्यांना माणूस म्हणून सन्मान देण्यास मात्र तयार नसत. तमाशातील स्त्री कलावंतांची अवस्था तर आणखी वेदनादायक होती. रंगमंचावर तिच्या नृत्याला दाद मिळायची. तिच्या लावणीवर पैसे उधळले जायचे. तिच्या सौंदर्याचे कौतुक केले जायचे. पण त्याच समाजात तिला प्रतिष्ठेचे स्थान मिळत नव्हते. तिच्या कलेपेक्षा तिच्या व्यक्तिमत्त्वाकडे संशयाने पाहिले जायचे. तिच्या कष्टांची, संघर्षाची, कुटुंबाच्या जबाबदारीची आणि मनातील भावनांची कुणाला पर्वा नव्हती.किती विचित्र समाजव्यवस्था होती ही!रात्री तिच्या कलेचा आनंद घ्यायचा आणि दिवसा तिलाच कमी लेखायचे. तिच्या घुंगरांचा आवाज हवा होता, पण तिच्या वेदनांचा आवाज नको होता. तिच्या लावणीवर टाळ्या हव्या होत्या, पण तिच्या आयुष्याला सन्मान नको होता.जर तिनेही संसार केला. मुलांना जन्म दिला. मुलांच्या शिक्षणाची स्वप्ने पाहिली. आजारपण सहन केले. उपासमार सहन केली. कित्येकदा स्वतःच्या वाट्याची भाकरी मुलांच्या ताटात वाढली असेल. स्वतःच्या डोळ्यांतील अश्रू पुसून दुसऱ्या रात्री पुन्हा रंगमंचावर उभी राहिली असेल.तिच्या कपाळावरील कुंकवापेक्षा रंगमंचावरील रंग अधिक उठून दिसत होता; पण तिच्या आयुष्यातील दुःख कुणालाच दिसत नव्हते.सोंगाड्याचेही असेच होते. संपूर्ण गावाला हसवणारा सोंगाड्या स्वतःच्या आयुष्यात किती रडत असेल, याची कल्पना आपण केली आहे का? लोकांना हसवणे हे त्याचे काम होते. त्यामुळे स्वतःचे दुःख लपवून ठेवणे ही त्याची जणू सवयच झाली होती. त्याच्या विनोदाला दाद मिळत होती; पण त्याच्या वेदनेला कुणी कान देत नव्हते.कदाचित त्याने आपल्या आयुष्यातील दुःखावरच एखादा विनोद केला असेल आणि गाव हसून हसून लोटपोट झाले असेल! हे कलावंत अन्यायाविरुद्ध बोलत होते. आपल्या कलेतून समाजाला प्रश्न विचारत होते. पण स्वतःच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची ताकद त्यांच्याकडे नव्हती. कारण त्यांच्या पायात परिस्थितीच्या बेड्या होत्या. उद्याच्या भाकरीची चिंता होती. मुलाबाळांच्या पोटाची जबाबदारी होती. त्यामुळे अपमान सहन करूनही त्यांना पुन्हा त्याच गावात, त्याच लोकांसमोर उभे राहावे लागत होते.हे सहन करणे त्यांची आवड नव्हती; ती त्यांची गरज होती. आज आपण आधुनिकतेच्या गप्पा मारतो. लोककलेचे संवर्धन, संस्कृतीचे जतन, कलाकारांचा सन्मान अशा घोषणा करतो. विविध महोत्सवांत तमाशाला रंगमंच मिळते. काही नामवंत कलावंतांचा गौरवही होतो. पण या कलेला पिढ्यान्पिढ्या जिवंत ठेवणाऱ्या असंख्य अनामिक कलावंतांचे काय?त्यांच्या वृद्धापकाळाचे काय? त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे काय? आजारपणात औषधांसाठी लागणाऱ्या पैशांचे काय? आयुष्यभर घुंगरू बांधलेल्या पायांना म्हातारपणी आधार कोण देणार? ज्यांनी आयुष्यभर दुसऱ्यांचे मनोरंजन केले, त्यांच्याच आयुष्याच्या शेवटच्या पर्वात त्यांची विचारपूस करणारे किती जण उरतात?किती कलावंतांची म्हातारपणातील अवस्था हलाखीची झाली असेल! किती जणांचे आयुष्य उपेक्षेच्या अंधारात संपले असेल! किती जणांच्या कलेचा वारसा पुढे नेणारी मुले आर्थिक विवंचनेमुळे दुसऱ्या व्यवसायाकडे वळली असतील!आपण त्यांच्या कलेचा वारसा सांगतो; पण त्यांच्या संघर्षाचा वारसा स्वीकारायला तयार नाही.महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे लेखन करताना या कलावंतांना केवळ मनोरंजन करणारे म्हणून नोंदवणे अन्यायकारक ठरेल. त्यांनी ग्रामीण समाजाचे प्रबोधन केले. लोकजीवनातील विसंगती मांडल्या. समाजाच्या जगण्याला अभिव्यक्ती दिली. आपल्या कलेसाठी स्वतःचे आयुष्य खर्ची घातले. त्यांच्या कलेतून महाराष्ट्राची लोकसंस्कृती समृद्ध झाली.त्यांच्या जीवनावर संशोधन व्हायला हवे. त्यांच्या आठवणी जतन व्हायला हव्यात. त्यांच्या कलेचे दस्तऐवजीकरण व्हायला हवे. त्यांना आर्थिक सुरक्षितता, आरोग्य सुविधा, निवृत्तीवेतन आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळायला हवी. कारण लोककलेचे संवर्धन म्हणजे केवळ कार्यक्रम आयोजित करणे नव्हे; तर त्या कलेच्या माणसांचे आयुष्य सावरणे होय.आजही कुठेतरी एखाद्या जुन्या पेटीत घुंगरू पडलेले असतील. एखाद्या घराच्या कोपऱ्यात धूळ खात ढोलकी पडली असेल. एखाद्या वृद्ध कलावंताच्या मनात जुन्या फडाच्या आठवणी जाग्या होत असतील. त्याला आठवत असेल तो कंदिलाचा उजेड, प्रेक्षकांच्या टाळ्या, लावणीला मिळालेली दाद, सोंगाड्याचे विनोद आणि गावोगावी केलेला प्रवास.कदाचित आज त्याच्या पायात घुंगरू बांधण्याचे त्राण नसेल. आवाजात पूर्वीसारखी ताकद नसेल. पण मनात अजूनही तोच फड जिवंत असेल.कधी त्याला वाटत असेल, पुन्हा एकदा ढोलकीचा ठेका सुरू व्हावा, पुन्हा एकदा घुंगरांचा नाद घुमावा, पुन्हा एकदा लोकांनी टाळ्या वाजवाव्यात!पण त्या टाळ्यांपेक्षा आज त्याला गरज असेल ती दोन प्रेमाच्या शब्दांची, थोड्या आधाराची आणि माणूस म्हणून मिळणाऱ्या सन्मानाची.शेवटी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते...ज्या समाजाने त्यांच्या कलेतून आनंद घेतला, त्या समाजाने त्यांच्या दुःखात सहभागी व्हायला हवे होते. ज्यांनी गावाला हसवले, त्यांच्या आयुष्यातील अश्रू पुसायला हवे होते. ज्यांनी कंदिलाच्या उजेडात महाराष्ट्राची लोकसंस्कृती जिवंत ठेवली, त्यांच्या आयुष्यातही सुखाचा दिवा लावायला हवा होता.पण दुर्दैवाने तसे झाले नाही.त्यांच्या घुंगरांचा आवाज इतिहासात राहिला, त्यांच्या लावण्या लोकांच्या स्मरणात राहिल्या, त्यांच्या विनोदांच्या आठवणी पिढ्यान्पिढ्या सांगितल्या गेल्या; पण त्यांचे अश्रू, त्यांची उपासमार आणि त्यांचा अपमान मात्र इतिहासाच्या पानांवर आलेच नाहीत.जगाला हसवणारे हे कलावंत स्वतः मात्र आयुष्यभर रडत राहिले.त्यांच्या कलेला महाराष्ट्राने डोक्यावर घेतले; पण त्या कलेच्या निर्मात्यांना मात्र कधीच खांद्यावर घेतले नाही!ही केवळ तमाशा कलावंतांची वाताहत नाही, तर आपल्या समाजाच्या सांस्कृतिक संवेदनशीलतेचे अपयश आहे.रंगमंचावर त्यांचा जयजयकार झाला; पण आयुष्याच्या रंगमंचावर त्यांच्या वाट्याला उपेक्षाच आली. ही वेदना आपण विसरता कामा नये.

डॉ. बाळासाहेब बा. लिहिणार
छत्रपती संभाजीनगर

राबणारा बाप

रागीट स्वभावाचा बाप,
इथे प्रत्येकाला दिसतो.
सर्वांची काळजी घेणारा,
बाप कधीच दिसत नसतो. १

सर्वांसाठी राबणारा बाप,
प्रत्येकाची काळजी घेतो.
ओळखून त्याची किंमत,
जगतांना कोण भाव देतो. २

शेवटच्या श्वासापर्यंत बाप,
कुटुंबासाठी धावत असतो.
धावता धावता बाप कुठे,
आराम करायला बसतो. ३

संकटांशी लढता लढता,
बाप कधी कुठे थकतो.
सर्वांच्या सुखासाठी स्वतः,
सुख उपभोगण्यास मुकतो. ४

मुला बाळांच्या सुखाला,
स्वतःचे सुख समजतो.
निस्वार्थपणे राबणारा,
बाप कोणाला उमजतो. ५

बाप उमजण्यासाठी,
बापचं व्हावे लागते.
बाप झाल्यावर मात्र,
विचारात रात्र जागते. ६



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103